RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ७६ ] बुधवार, सप्टेंबर ९, २०२६/भाद्रपद १८, शके १९४८ [पृष्ठे ५ , किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ११७**

**प्राधिकृत प्रकाशन**

### जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर यांजकडून

**दमणगंगा- वैतरणा-गोदावरी (कडवा-देव नदी) नदी जोड प्रकल्पासाठी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना, करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ११ (१) खालील**

**प्राथमिक अधिसूचना**

क्रमांक भूसंपादन/दमणगंगा वैतरणा गोदावरी धरण/अधिसूचना ११(१)/कावि-४०/२०२६, दिनांक ३ सप्टेंबर २०२६—भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम ३ च्या खंड (इ) च्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२/दिनांक १९ जानेवारी २०१५(यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा अधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याचे स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदी अन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तिंचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ चा पोट-कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईलः

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) नुसार भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क ( महाराष्ट्र ) नियम १४ (यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाचा अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (ख) समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, पालघर यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी अपर निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांस पदनिर्देशित केले आहे.

पालघर,
दिनांक ३ सप्टेंबर २०२६.

**महेश सागर,**
सक्षम प्राधिकारी तथा
अपर निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर.

## अनुसूची एक
## जमिनींचा तपशील

**तालुका : मोखाडा जिल्हा : पालघर**

| अ. क्र. | गाव | गट क्रमांक | संपादित करावयाचे अंदाजित क्षेत्र (हे.आर./चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | मौजे उधळे | ९८/१ | ०.१७.४२ |
| | | **एकूण** | **०.१७.४२** |

**तालुका : मोखाडा जिल्हा : पालघर**

| अ.क्र. | गाव | गट क्रमांक | संपादित करावयाचे अंदाजित क्षेत्र (हे.आर./चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | **मौजे जोगळवाडी** | ९७ | ०.९६.८४ |
| २ | | ९८ | १.१६.०० |
| ३ | | ९४ | ०.००.४७ |
| ४ | | ९५ | ०.००.३९ |
| ५ | | ६१ | ०.२७.४५ |
| ६ | | ५७ | ०.०१.८० |
| ७ | | ५९ | ०.०९.२९ |
| | **एकूण** | | **२.५२.२४** |

**तालुका : मोखाडा जिल्हा : पालघर**

| अ.क्र. | गाव | गट क्रमांक | संपादित करावयाचे अंदाजित क्षेत्र (हे.आर./चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | **मौजे सायदे** | ३४० | ०.०३.०० |
| २ | | ३५४ | ०.९२.५९ |
| ३ | | १७ | १.१४.२६ |
| ४ | | २३४ | ०.०३.६५ |
| ५ | | ३४७ | ०.२८.८७ |
| ६ | | २७६ | १.११.३० |
| ७ | | २७७ | ०.२५.९४ |
| ८ | | २७९ | ०.३५.६२ |
| ९ | | २८१ | ०.५३.८९ |
| १० | | ४३ | ०.०७.९७ |
| ११ | | ३०४ | ०.०१.८२ |
| १२ | | २९९ | ०.१३.०० |
| १३ | | २९७ | ०.०२.०० |
| १४ | | २९८ | ०.२१.०० |
| १५ | | २९६ | ०.०६.०० |
| | | **एकूण** | **२०.९७.२६** |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव : | दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा - देव नदी) नदी जोड प्रकल्प, ता. मोखाडा, जि. पालघर . |
| प्रकल्पाचे वर्णन : | दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा - देव नदी) नदी जोड प्रकल्प हा महाराष्ट्रात आहे. |
| समाजाला मिळणारे लाभ : | दमणगंगा तसेच वैतरणा उप-खोऱ्यातील एकूण १६०.९७ दलघमी (५.६८ TMC) अतिरिक्त पाणी उर्ध्व गोदावरी उप-खोऱ्यात वळविणे तसेच सदर प्रकल्पाचे पाणी स्थानिक वापरासाठी व सिंचनासाठी वापर करणेबाबत. |

## अनुसूची - तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

१. प्रकल्पाच्या बांधकाम

२. प्रकल्पाच्या परिचालक

३. प्रकल्पाच्या देखभालीसाठी

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता आहे.

## अनुसूची - चार

## (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्याऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. संकीर्ण -०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२, दि. १३.०३.२०१५ द्वारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम १० क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येते. परंतु कलम ६ (२) मधील परिच्छेद २ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे की, जर कालवे काढण्याच्या योजना असतील जेथे पर्यावरण प्रभाव आकारणीची कारवाई ही एखाद्या कायद्यान्वये किंवा भविष्यात अस्तित्वात येणाऱ्या संदर्भिय अधिनियमाच्या कायद्यान्वये दिलेल्या तरतुदीनुसार अनिवार्य असेल तर तेथे सामजिक प्रभाव आकारणी लागू पडत नाही.

त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील जा.क्र. नामंप्रवि/भूसंदवैगो १/१९५८/२०२६ दि. ०१/०६/२०२६ अन्वये EIA प्रमाणपत्र सादर केलेले आहे की दमणगंगा - वैतरणा - गोदावरी (कडवा देव नदी) नदी जोड प्रकल्प, ता. मोखाडा, जि. पालघर या प्रकल्पासाठी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA) भारत सरकार यांच्या दरम्यान दि. १९/०६/२०१९ रोजी सामंजस्य करार (MOU) झाला असून सदर सामंजस्य करारांतर्गत राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA) यांच्या तर्फे सदर प्रकल्पासाठी पर्यावरणीय परिणाम निर्धारण (EIA) याचा अभ्यास व मान्यता मिळण्याचे काम प्रगतिपथावर आहे व प्रशासकीय विचारार्थ विषय/ Terms of Reference (TOR) ची मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे या प्रकरण्यात भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १०(क) च्या खंड ख प्रमाणे (SIA) सूट मिळणेबाबत प्रशासकीय परवानगी घेणेची आवश्यकता नाही.

**अनुसूची - पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासनाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासन म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | **उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर** |
| ब. | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | **उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर जिल्हा मुख्यालय, पालघर, कोळगाव, पालघर बोईसर रोड, ता. जि. पालघर ४०१ ४०४.** |
| क. | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील | **महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, वर्ष ५, अंक ९२(२), गुरुवार, जुलै ११,२०१९/आषाढ २०,शके १९४१, महसूल व वन विभाग,अधिसूचना दिनांक ०९ जुलै २०१९ अन्वये उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे.** |

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. सदर अधिसूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी तथा अपर निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

पालघर,
दिनांक ३ सप्टेंबर २०२६.

**महेश सागर,**
सक्षम प्राधिकारी तथा
अपर निवासी उप जिल्हाधिकारी,पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.